महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN No. U40109MH2005SGC153646)

द्वारा: कार्यकारी अभियंता
कार्यालयाचे नांव : अउदा प्रकल्प विभाग, सांगली
कार्यालयाचा पत्ता: २रा मजला, प्रशासकीय इमारत, विश्रामबाग, सांगली - ४१६४१५
संपर्क : ०२३३-२३०११८७, ०२३३-२३०११३७ (F), ०२३३-२३०२९९७ (P)
Email Id: ee3620@mahatransco.in, Website : www.mahatransco.in

संदर्भ: काअ/अउदा/प्रकल्प/वि/सांगली/नं. [redacted] 0142 दि. 28 JAN 2020

## E-ENQUIRY NO.11

कामाचा प्रकार - प्रवासी डीझेल वाहन टाटा सुमो / बुलेरो / तत्सम या कार्यालयांतर्गत येणा-या अउदा प्रकल्प वाहिनी उपविभाग, सातारा या कार्यालयास भाडे तत्वावर घेणेबाबत.

नियम व अटी -

१. वाहन दैनंदिन भाडयाने घेतले जाईल.

२. वाहनास लागणारे फक्त डिझेल कंपनीकडून पुरविले जाईल.

३. वाहन उत्तम अवस्थेत असणे आवश्यक आहे व मॉडेल २०१५ किंवा नंतरचे असावे.

४. वाहन चालविण्यासाठी चालक, वाहन मालकाने नेमावयाचा आहे.

 अ. वाहन चालक निर्व्यसनी असावा.

 ब. वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

 क. वाहन चालक निष्णात व आज्ञाधारक असावा.

 ड. वाहन चालक कार्यालयीन वेळेत हजर असावा व इतर वेळी गरजेनुसार उपलब्ध व्हावा.

५. वाहन दुरुस्तीचे व इतर सर्व कामे मालकाने स्वखर्चाने पहावयाची आहेत.

AA(F&A) [signature] २८/१/२०

६. वाहन आठवडयातून एक दिवस किरकोळ दुरुस्ती व देखभालीसाठी मालकाकडे दिले जाईल.

७. दुर्दैवाने वाहनास कांही अपघात झाल्यास अगर मोडतोड झाल्यास त्यास विद्युत कंपनी जबाबदार राहणार नाही.

८. वाहनाचे मोठया दुरुस्तीचे कालावधीस आपणांस दुस-या वाहनाची पर्यायी व्यवस्था करावी लागेल, अन्यथा दैनिक आकाराच्या १०० टक्के रक्कम दंड म्हणून वसूल केली जाईल.

९. वाहन रात्री कंपनीचे कार्यालयासमोर उभे करावे लागेल. गाडीच्या मालाची चोरी झाल्यास त्यास विद्युत कंपनी जबाबदार राहणार नाही.

१०. वाहन मालकाने आर.टी.ओ.च्या सर्व पूर्तता व जबाबदा-या स्वत: अद्यावयात ठेवण्याचे आहेत.

११. भाडोत्री वाहन कंपनीचे सेवेत ठेवावयाचे किंवा नाही या बाबतचे पूर्ण अधिकार कंपनीकडे राहतील.

१२. मासिक भाडेचे रकमेबाबत देयक विद्युत कंपनीकडे महिना अखेरीस द्यावे लागेल. त्या नंतर योग्य कालावधीत देयकाची रक्कम अदा केली जाईल. देयकाची रक्कम देताना शासकीय नियमाप्रमाणे लागू असलेले सेवा कर, आयकर, इत्यादी कपात केली जाईल.

१३. गाडीचा पूर्ण भरपाईचा विमा (फुल्ल इन्शुरन्स) असणे आवश्यक आहे.

१४.जे वाहन भाडयाने देण्यात येणार आहे त्यास टुरिस्ट परमीट असणे आवश्यक आहे.

१५. कोटेशन पाठविताना प्रवासी वाहनाची सविस्तर माहिती व आर.टी.ओ.संबंधित कागदपत्रांची माहिती लिहीणे आवश्यक आहे व सोबत खालील झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

१. प्रवासी वाहन रजिस्ट्रेशनची प्रत

२. टॅक्स भरलेल्या पावतीची प्रत.

३. परमिटची सत्यप्रत.

४. विमा भरलेल्या पावतीची प्रत

५. प्रवासी वाहन क्षमतेचे आर.टी.ओ. चे महाराष्ट्र राज्य वाहन आयुक्त यांचे प्रमाणपत्र.

६. टाटा सुमो / बुलेरो वाहनाचे ॲव्हरेज कमीत कमी १२ कि. मी./लिटर असणे आवश्यक आहे.

७. पॅन कार्ड झेरॉक्स प्रत.

८. फिटनेस प्रमाणपत्र.

१६.वाहन कंपनीचे कामाच्या वाहतुकीसाठी / तपासणीसाठी जाणारे अधिकारी यांचे प्रवासासाठी उपयोगात आणावयाचे आहे. वाहन सेवेसाठी हजर ठेवणेची वेळ उपविभागीय कार्यालयाकरीता ०९:०० पासून सुरू होईल व सेवेचा काळ ४ तासापेक्षा कमी असेल तर १/२ दिवस धरला जाईल पण ४ तासांच्या आत गाडी बंद पडली तर तो दिवस देयकासाठी धरला जाणार नाही. वाहन कंपनीचे कामावर असून कोणत्याही कारणासाठी क्षेत्रीय अभियंता वा प्रभारी अधिकारी यांनी वापरली नाही तरी भाडे दर दिला जाईल.

१७. ड्रायव्हरसाठी कामाची वेळ उपविभागीय कार्यालयाकरीता सकाळी ०९:०० ते सायंकाळी १९:०० पर्यंत राहील. गाडीचा मुक्काम रात्री सातारा बाहेर राहिल्यास मुक्कामाबद्दल किंवा ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जास्त गाडीचा वापर झाल्यास योग्य तो मोबदला दिला जाईल.

१८. विद्युत कंपनीने फक्त वापर केलेल्या दिवसाचेच भाडे दिले जाईल व सुट्टी दिलेल्या दिवसाचे भाडे दिले जाणार नाही.

१९. सदरील वाहन हे सर्व साधारणपणे सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर जिल्हयात वापरण्यासाठी घेणार असले तरी परिस्थितीनुसार व वेळ प्रसंगी वरील अखत्यारी बाहेरील ठिकाणी पाठविणेचा हक्क खालील सही करणा-यांना वा उपविभागीय अधिका-यांना राहील.

२०. सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये दराची नोंद करून वरील कागदपत्रांसह या कार्यालयात सिल बंद करून जमा करावे.

तरी इच्छुकांनी आपले, सिलबंद कोटेशन या कार्यालयास दि.०४.०२.२०२० रोजी सां. ०५:३० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशी पाठविणेची व्यवस्था करावी.

**Manager (F & A)**
**EHV Projects Division, Sangli.**

कार्यकारी अभियंता
अउदा प्रकल्प विभाग, सांगली

प्रत सादर -
व्यवस्थापक (विव्ले) अउदा प्रकल्प विभाग, सांगली.
सुचना फलक

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY TRANSMISSION CO. LTD.**
**EHV PROJECTS DIVISION SANGLI**

**Schedule - 'A'**

Sub : Hiring of TATA Sumo / Bolero / utility vehicle equivalent or above for EHV Lines Projects S/Dn., Satara

| Sr. No. | Particulars | Unit | Estimated Rate in Rs. | Rate quoted in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Providing 1 no. of TATA Sumo / Bolero / utility vehicle equivalent or above for EHV Lines Projects S/Dn., Satara | Per days | 1000/- | |
| 2 | Overtime | | | |
| | a) Per hour | per hour | 50/- | |
| | b) Night halt / maximum for 1 day | Per halt | 150/- | |

Note:

1) The rate quoted should be exclusive of GST.
2) GST will be paid by MSETCL if applicable.
3) Kindly mention on quotation whether registered under GST or not. If yes, then submit the GST registration Certificate and if no, then submit the undertaking for exemption from GST.
4) Quotations submitted without signature of authorized signatory, incomplete/ expired vehicle documents & without rubber stamp of agency shall be treated as invalid.
5) Rate quoted shall be AT PAR (equal to) or less than estimated rates mentioned at column (4).

Signature & Stamp of Agency

Executive Engineer
EHV Projects Dn., Sangli

**Manager (F & A)**
**EHV Projects Division, Sangli.**